**सकाळी ११.०० पासून ते दुपारी ३.२५ पर्यंत साक्षीदार हजर. सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचा अनेक वेळा पुकारा केला असता, सहाय्यक सरकारी अभियोक्ता गैरहजर असल्यामुळे कलम ३०९ फौ.प्र.सं. प्रमाणे सहाय्यक सरकारी अभियोक्ताच्या अनुपस्थितीत साक्षीदाराचा पुरावा नोंदविण्यात येतो.**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०२ ची साक्ष**

**निशाणी ११**

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव – राजेंद्र विनायक जाधव

माझे वय – ४६ वर्षे,

व्यवसाय – शेती

रा.ने. – रामगड बौध्दवाडी, ता. मालवण, जि.सिंधुदुर्ग

**सरतपास न्यायालयामार्फत.**

०१. दि. २९/११/२०२३ रोजी पोलीसांनी मला पंचनाम्यासाठी बोलविले होते. त्यानंतर मी घटनास्थळी गेलो होतो. सदरचे घटनस्थळ कणकवली आचरा जाणाऱ्या रस्त्यावरती गांगेश्वर व पीएसी केंद्राच्या समोर आहे. घटनास्थळ हे गांगेश्वर मंदिरापासून साधारणपणे २०० मीटर अंतरावरती होते. घटनास्थळावरती दोन मोटरसायकलींचा एकमेकाशी अपघात झालेला होता. अपघातातील एक गाडी होंडा युनिकॉर्न व दुसरी होंडा शाईन होती. मला सदर गाडयांचे नोंदणी क्रमांक सांगता येणार नाहीत. गांगेश्वर मंदिराकडून शाईन वाहन बाहेर पडलेले होते. युनिकॉर्न गाडी कणकवली वरुन आचऱ्याच्या दिशेने जात होती. युनिकॉर्न गाडीच्या दर्शनीय भागाचे नुकसान झाले होते. शाईन गाडीचे पाठीमागच्या बाजूने नुकसान झाले होते. मला घटनास्थळाच्या चतुःसिमा सांगता येतील. कणकवली आचरा रस्त्याच्या पुर्वेस – गड (किल्ला), पश्चिमेस – एक घर, दक्षिणेस – गांगेश्वर मंदिर, उत्तरेस – हॉस्पीटल आहे. कणकवली आचरा जाणारा रस्ता पुर्व पश्चिम आहे. माझ्या समक्ष पंचनामा

झाला होता. आता मला **<u>निशाणी पी.१/पी.डब्ल्यू १</u>** वरील घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. सदरचा पंचनामा माझ्या समक्ष झालेला आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे.

सरतपास पुर्ण.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.एस.एन.पई यांचे मार्फत.</u>**

०२. हे म्हणणे खरे आहे की, पंचनामा कुठल्या तारखेला व कुठल्या कालावधीमध्ये केला होता हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, कणकवली आचरा जाणारा मुख्य रस्ता गांगेश्वर मंदिराजवळ थोडासा चढावाचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, गांगेश्वर मंदिराकडून कणकवली आचरा या मुख्य रस्त्याकडे जाणारा रस्ता तीव्र चढावाचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, गांगेश्वर मंदिराकडून रस्त्याकडून मुख्य रस्त्यावरती दुचाकी वाहन चालक अचानकपणे गेल्यामुळे यापुर्वी अनेक अपघात झालेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, कणकवली आचरा या मुख्य रस्त्यावरती जाणाऱ्या दुचाकीस्वारास गांगेश्वर मंदिराकडून येणारा दुचाकीस्वार जोपर्यंत मुख्य रस्त्यावरती येत नाही तोपर्यंत सदरचा दुचाकीस्वार दिसत नाही. घटनास्थळापासून रामगड बौध्दवाडी साधारणपणे ३०० मीटर अंतरावरती आहे.

०३. पंचनाम्यामध्ये युनिकॉर्न गाडी कणकवलीकडून आचऱ्याच्या दिशेने जात होती व शाईन गाडी गांगेश्वर मंदिराकडून येत होती याबाबी पंचनाम्यामध्ये लिहिल्या होत्या किंवा नाही हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी पोलीसांना पंचनाम्यातील मजकूर सांगितला व पोलीसांनी त्यातील मजकूर लिहून घेतला असे काही घडले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी पंचनाम्यातील मजकूर लिहिला व त्यावर माझी सही घेतली होती.

०४. हे म्हणणे खरे नाही की, मला पंचनाम्यासाठी बोलविले होते, मी घटनास्थळी गेलो होतो, माझ्या समक्ष घटनास्थळ पंचनामा केला होता हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीला मदत करण्यासाठी पंचनामा माझ्या समक्ष झालेला नसतानाही पंचनामा माझ्या समक्ष झालेला आहे हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज

रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

महेश रा. देवकते
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मालवण

दिनांक : ०१/०७/२०२४